e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024
SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Journal for all Subjects
Research Article / Survey Paper / Case Study
Published By: SK Publisher
(www.skpublisher.com)
*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*
Special Issue: National Interdisciplinary Conference on "Women Empowerment: Issues, Challenges and Solutions"
Organised by: Department of Political Science & I. Q. A. C., Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.
(Sponsored by PM-UShA Grants to Strengthen Colleges)

# महिला सक्षमीकरण : गरज, कारणे आणि उपाय

**प्रा. डॉ. संगीता तिहिले**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
सुधाकरराव नाईक उमाशंकर खेतान कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला

**DOI:** https://doi.org/10.61165/sk.publisher.v11i12.83

**प्रस्तावना**

स्त्री ही मानवी सृष्टीची .... मानवाच्या उत्पत्तीची जननी... जन्मदा आहे. 'स्त्री' ही संपन्नतेची, आदर्शाची असिम ठेव असून वासल्याचा संस्काराचा, विचारांचा अनमोल, अमूर्त खजिना आहे. माणसाच्या आयुष्यामध्ये विविध नात्यांच्या रूपाने स्त्रीचा सहवास मनाला सुखावून टाकणारा आणि जीवन जगण्यास उर्मी, ऊर्जा, बळ व आनंद देणार आहे. समाज निर्मितीच्या प्रक्रियेत स्त्री-पुरुष यांना महत्त्वाचे स्थान आहे. कुटुंबप्रधान समाजव्यवस्थेमध्ये स्त्री ही कुटुंबाचा मूलभूत घटक आहे व अविभाज्य अंग आहे. प्रत्यक्षात स्त्री-पुरुषांच्या जगण्याच्या संधीत जीवनाच्या पातळीवर विषमता दिसून येते. सामाजिक कुटुंब व्यवस्थेत महिलांना दुय्यम स्थान प्राप्त झालेले आहे. त्यांना विकासाच्या संधी नाकारण्यात आल्यामुळे कौटुंबिक विकास एकांगी झाल्याने समाज व देशाचे अपरिमित नुकसान झालेले आहे. एकविसाव्या शतकातील समाज घडविण्यासाठी महिलांना त्यांचे मानवी हक्क बहाल करणे आवश्यक आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी समाजाच्या मानसिकतेबरोबर कुटुंबाची मानसिकता उपयुक्त आहे. महिलांच्या प्रती असणारा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. लोकसंख्येने निम्मे प्रमाण असणाऱ्या महिलांच्या शैक्षणिक, शारीरिक, मानसिक, सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक, व्यवसायिक, कौटुंबिक स्थितीचा, विकासाच्या वाटेने प्रवास करताना राष्ट्रनिर्माणाच्या दृष्टीने विचार करणे अगत्याचे आहे. जीवनाच्या उत्कर्षाच्या विविध क्षेत्रांमध्ये महिलांची भूमिका व योगदान यावर अध्ययन होणे आणि प्रगत, संस्कृत, समृद्ध राष्ट्रासाठी महिलांच्या उन्नतीच्या उपाययोजना करणे गरजेचे आहे.

प्राचीन भारतामध्ये प्रत्येक धर्मामध्ये स्त्रियांना .. 'नारीला' देवीचा दर्जा दिला जात होता. वैदिक युगामध्ये इ.स. पूर्व 2000 ते 500 वर्षांमध्ये मुलींना शिक्षणाच्या संधी होत्या, त्यांना आर्थिक स्वातंत्र होते, महिला धार्मिक, अध्यात्मिक, बौद्धिक शैक्षणिक कार्यामध्ये कार्यरत होत्या. त्या काळातील मैत्रेयी, गार्गी, घोषा, आत्रेयी यासारख्या प्रतिभाशाली महिला प्रसिद्ध होत्या. मात्र नंतर काळ बदलला मुलींकरिता शिक्षणाची कवाडे बंद झाली. लिंगभाव व शरीरलक्षणानुसार कामाची विभागणी झाली. पुरुषप्रधान कुटुंब पध्दतीमुळे कुटुंबावर पुरुषांचे प्रभुत्व निर्माण झाले. स्त्रियांचे वरवर गौरवीकरण होत असताना प्रत्यक्षात मात्र स्त्रियांना दुय्यम स्थान मिळू लागले. स्त्रीला दुर्बल समजण्यात येऊ लागले. पडदा पद्धत,

*© 2024, SK Publisher All Rights Reserved*

सतीची चाल, हुंडा पद्धत, बालविवाह, विधवांना विवाह बंदी, स्त्रीचे तिच्या पतीच्या मृत्युनंतर केशवपन हयासारख्या अनिष्ट रूढी व परंपरांमुळे महिलांवर अत्याचार होऊ लागले.

लिंगभेद, अज्ञान, निरक्षरता, दारिद्र्य, रूढी परंपरा, अंधश्रद्धेचे पालन, पुरुषांची व्यसनाधीनता, आरोग्याची हेळसांड आणि शोषणाच्या या दृष्टचक्रात विपरीत परिस्थितीत महिला पिचल्या जाऊ लागल्या. त्यांना कोणतेही निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नव्हते व त्यांचे कार्यक्षेत्र फक्त चूल आणि मूल एवढे सीमित होते. मुलांना जन्म देणे, त्यांचे पालनपोषण करणे, घरांदारांत व शेतात राबराब राबणे एवढेच त्यांना माहित होते.

आधुनिक युगामध्ये यामध्ये परिवर्तन होऊन जागरूकता आली समाजातील पुरोगामी विचारसरणीच्या पुरुषांनी या अन्यायाविरुद्ध बदल घडवून आणायला सुरुवात केली तीक्रांतीज्यो .सावित्रीबाई फुले व श्रीमती सरोजिनी नायडू यांनी महिला सक्षमीकरणांमध्ये मोलाचे योगदान दिले . स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली झाली, आजमितीस महिला साक्षरतेचे प्रमाण 77% आहेशिक्षणाच्या प्रसाराने तसेच स्त्रियांना शिक्षणाच्या संधी . तचप्राप्त झाल्यामुळे तव्दवैज्ञानिक, तांत्रिक, औद्योगिक विकासामुळे हळूहळू भारतातील परिस्थिती सुधारत आहे. महिलांमध्ये विज्ञानवादी, वास्तववादी दृष्टिकोन वृद्धींगत होत असून त्या अनिष्ट, घातक रूढी परंपरेतून बाहेर पडत आहेत आणि आपल्या मूलभूत हक्काबाबत जागृत होत आहेत . महिला शिक्षण घेऊन कौशल्ये आत्मसात .ढत आहेमहिलांचा सामाजिक व सांस्कृतिक कार्यामधील सहभाग दिवसेंदिवस वाकरून नोकरीद्वारे अर्थाजन करीत आहेत अशा प्रकारे प्रशासकीय, वैद्यकीय, विधी, अभियांत्रिकी, शैक्षणिक क्षेत्र, राजकीय पदाधिकारी अशा अनेक पदावर काम करीत आहेत आणि आत्मनिर्भर व स्वावलंबी होत आहेत.

मतदानाचा अधिकार आणि राजकीय क्षेत्रातील आरक्षणामुळे तळागाळातील महिलांना राजकीय क्षेत्रात संधी मिळत आहेत याचीच परिणिती 2024 चे लोकसभेमध्ये 74 महिला खासदार आहेत. कौटुंबिक क्षेत्रामध्ये कुटुंबाचे पालनपोषण, संगोपणापासून विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये त्या कुटुंबाला संस्कार देऊन आर्थिक हातभार लावून आनंदी कुटुंबाचा मार्ग मोकळा करीत आहेत.

आज जगण्याचे संदर्भ बदलत चालले आहेत. वैश्विकरणामुळे जग जवळ येत आहे. जातीभेद, वर्णभेद, लिंगभेद पार गळून पडलेले आहेत जगण्याची स्पर्धा वाढलेली आहे. महागाई, बेरोजगारीने जगणे मुश्किल झाले आहे. तंत्रज्ञानाच्या वैज्ञानिक आधुनिक युगात जगण्याचा संघर्ष वाढलेला आहे. नव्या युगाची नवीन आव्हाने स्विकारण्याकरिता आणि वेगाने पुढे जाण्याकरिता सशक्त, सुदृढ, शिक्षित, कौशल्याधिष्ठीत, निष्णात समाज निर्मितीची गरज आहे. त्याकरिता बहुसंख्येने असलेला महिलावर्ग शिक्षित, सशक्त, पात्र व सक्षम करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने महिला सक्षमीकरणाची चळवळ उपयुक्त आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. महिलांच्या शैक्षणिक सामाजिक राजकीय आणि कौटुंबिक स्थितीचा आढावा घेणे
2. कुटुंब उभारणीमध्ये महिलांची भूमिका व योगदान तपासणे
3. महिला सक्षमीकरणाकरीता केलेल्या कार्याचा मागोवा घेणे .
4. महिलांना आत्मनिर्भर स्वयंपूर्ण व सक्षम बनविण्यासाठी उपाय सुचविणे

**महिला सक्षमीकरण**

संयुक्त राष्ट्रसंघांनी घालून दिलेल्या तत्त्वानुसार महिला सक्षमीकरण हे मानवी हक्काच्या अधीन असून प्रत्येक स्त्रीला शिक्षण देऊन हिंसाचारापासून सुरक्षित राहून आरोग्य सेवेमध्ये प्रवेश करून आणि स्वतःसाठी उपजीविका करून तिच्या समाजात सहभागी होऊन सक्षम होण्याचा अधिकार आहे.

**महिला सक्षमीकरण म्हणजे ...**

"महिलांच्या व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय उन्नती व विकासाकरिता त्यांची दारिद्र्य, अज्ञान, लिंगभेद, अत्याचारापासून मुक्तता करून त्यांचे मानसिक परिवर्तन घडवून आणून त्यांना शैक्षणिक सामाजिक राजकीय व्यावसायिक आर्थिक क्षमता प्राप्त करण्याकरिता संधी, अधिकार, गती आणि प्रोत्साहन देऊन महिलांमध्ये जाणीव निर्माणाची आणि क्षमता बांधणीची प्रक्रिया होय."

**महिला सक्षमीकरण ....उद्दिष्टे:**

1. परंपरेने शेकडो वर्षे लिंगभेदामुळे कुटुंबात व समाजात दुय्यम गौण / स्थान असलेल्या समाजाने दुर्बल ठरविलेल्या आणि कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय निर्णय प्रक्रियेमध्ये सहभाग हक्क व अधिकार हिरावलेल्या महिलांना लिंगभेद बाजूला सारून पुरुषांच्या बरोबरीने स्थान, सन्मान, संधी व दर्जा मिळवून देणे.
2. महिलांमध्ये आत्मभान, आत्मसन्मान आणि आत्मविश्वास निर्माण करून त्यांना मनाप्रमाणे जगता यावं म्हणून निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देणे.
3. महिलांना आत्मनिर्भर, स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनवून कुटुंबाचे तसेच राष्ट्राचे आर्थिक उन्नतीस महिलांचे योगदान मिळवणे.
4. कुटुंबाचे जीवनमानाची गुणवत्ता, दर्जा उंचावून दारिद्र्याचे दुष्टचक्र भेदणे.
5. लोकशाही मूल्यांच्या बळकटीकरिता आणि सुयोग्य अनुसरणाकरिता तसेच अर्थव्यवस्था मजबूत करण्याकरिता सभ्य, शालीन समाजाची निर्मिती करणे.
6. महिलांनी निवडलेल्या वित्तीय, राजकीय आणि सामाजिक कार्यपद्धतीतून सामाजिक स्थिती व संरचनेमध्ये परिवर्तन घडविणे.
7. महिलांमध्ये त्यांचे अधिकार व त्यांच्या जबाबदारीची जाणीव निर्माण करणे.
8. महिलांना समान संधी व समान अधिकार देणे तसेच महिलांच्या योग्य विचार व माहितीच्या आदानप्रदानातून महिलांना स्वायत्तता - प्रदान करणे.
9. मुलींना शिक्षणाच्या संधी देऊन त्यांचेतील कलागुणांचा, कौशल्याचा विकास करून त्यांना तंत्र कुशल बनविणे.
10. लैंगिक समानता साधने व स्त्रीपुरुष समानता प्रस्थापित करणे-
11. महिलांना आहार व आरोग्या बाबत जागृत करणे.

© 2024, SK Publisher All Rights Reserved

12. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये चमकदार कामगिरीसाठी मुलींना प्रेरणा, प्रोत्साहन व संधी देणे.
13. महिलांना नोकरी अर्थकारण, राजकारण, समाजकारण, औद्योगिक, तांत्रिक क्षेत्रात समान वाटा व समान सहभाग निर्माण करून देणे.
14. महिलांची शारीरिक, मानसिक, बौद्धिक, शैक्षणिक व सामाजिक दुर्बलता दूर करून त्यांचा सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राष्ट्रीय उपक्रमांमध्ये संपूर्ण सहभाग व योगदान मिळवण्याकरिता शिक्षण, उद्योजकता, आरोग्य सुविधा, सुरक्षा, पुनरुत्पादनाचा अधिकार व सुधारणावादी कायदे केंद्रस्थानी ठेवणे.
15. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी योजना व कल्याणकारी कार्यक्रमांचे नियोजन करून हे उपक्रम गतिमान करणे.
16. महिलांमध्ये संघटन वाढवून महिलांचा आर्थिक व सामाजिक धोरणामध्ये कृतिशील सहभाग मिळवणे.
17. सर्व प्रकारच्या हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणे.
18. महिलांची संपत्ती, बौद्धिक साधने विचारधारेवर योग्य नियंत्रण असणे.

**महिला सक्षमीकरणाची कारणे:**

1. आजही समाजात स्त्रीपुरुष असमानता कायम आहे-, महिलांना न्याय मिळविण्यासाठी स्त्री पुरुष असमानता प्रस्थापित होणे गरजेचे आहे.
2. लिंगभावानुसार आणि शारीरिक लक्षणानुसार स्त्रीला 'अबला' समजले जाते आणि तिला कुटुंबात व समाजात गौण स्थान दिले जाते निर्णय प्रक्रीयेत सहभागाची संधी नाकारल्यामुळे कुटुंबाचे समाजाचे पर्यायाने राष्ट्राचे नुकसान होते
3. स्त्रीकडे उपभोगाचे साधन म्हणून पाहण्याची मानसिकता असल्यामुळे महिलांवर अत्याचार होतात ही मानसिकता बदलण्यासाठी व महिलांमध्ये अत्याचार थांबविण्यासाठी महिलांचे सक्षमीकरण गरजेचे आहे
4. कौटुंबिक हिसाचारापासून मुक्तीसाठी कारण दरवर्षी 50 हजार महिला कौटुंबिक अत्याचाराच्या बळी ठरतात
5. महिला मूलभूत अधिकारापासून वंचित राहतात
6. शिक्षणाअभावी आहार, आरोग्य, पोषण याबाबत महिला अनभिज्ञ व जागरूक नसल्यामुळे त्यांचे कुपोषण होत असून 60 टक्के माता कुपोषित आहेत दरवर्षी बालमृत्यूचे प्रमाण .20 लाख एवढे आहे
7. बहुसंख्येने असलेल्या महिला शिक्षित, संघटित नसल्यामुळे आणि निर्णय प्रक्रियेत त्यांना स्थान नसल्याने त्यांच्यातील क्षमतांचे निर्माण न झाल्यामुळे त्यांच्या संख्येचा गुणात्मक लाभ कौटुंबिक सामाजिक व राष्ट्रीय विकासासाठी व हितासाठी मिळत नाही.
8. महिला शक्तीकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्यांच्यातील शक्ती, सामर्थ्य निष्क्रीय ठरून आर्थिक, सामाजिक सांस्कृतिक, राजकीय हानी होऊन उत्कर्षाच्या प्रक्रिया प्रभावीत होते.

**महिला सक्षमीकरणा करिता कार्य / उपाययोजना**

अ) महिलांवरील अत्याचाराच्या संदर्भात महिलांना न्याय मिळण्याकरिता केलेल्या कार्यवाहीमध्ये सतीबंदी (1829) विधवा पुनर्विवाह मान्यता (1856), स्त्रिभृणहत्या प्रतिबंध कायदा (1870), आंतरजातीय विवाहास मान्यता (1872) आणि संतती वयामध्ये वाढ (1891) चा प्रामुख्याने समावेश होतो. सर्वप्रथम नैरोबी येथे 1985 साली महिला संमेलनामध्ये महिला सक्षमीकरणाचे बीज रोवले गेले. भारतामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये इ.स. 2001 हे वर्ष महिला सक्षमीकरणाचे वर्ष मानले गेले.ब भारतीय राज्यघटनेमध्ये कलम (14 नुसार -कायद्यापुढे सर्व समान आहेत

कलम 15 नुसार -धर्म, वंश, लिंग, किंवा जन्मस्थान यावरून भेदभाव करण्यास मनाई आहे .

कलम 16 नुसार -सेवा योजनांमध्ये स्त्री पुरुषांना समान संधी आहे-

कलम 39 - नुसार (क) उपजीविकेचे साधन मिळविण्याचा स्त्री पुरुषांना समान अधिकार आहे-

कलम 39 (घ (नुसार -समान कामाकरिता स्त्रीपुरुषांना समान वेतन मिळावे-

कलम 44 नुसार -समान नागरी कायदा

इ.सन .1976 मध्ये महिलांकरिता राष्ट्रीय ॲक्शन प्लॅन स्वीकारण्यात आला असून त्याद्वारे स्त्रि विकासाच्या कार्याबाबत मार्गदर्शन मिळते .

भारतीय दंड सहीते नुसार 1960 मध्ये महिलांवरील अपराधासाठी कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे.

31 जानेवारी 1992 रोजी महिलांकरिता **'महिला आयोगाची'** स्थापना करण्यात आलेली आहे

**महिला सक्षमीकरणाकरीता सुचना :**

1. महिलांना प्रतिनिधित्व मिळून त्यांच्याशी संबंधित समस्या व गरजांविषयी समर्थपणे बोलण्याकरिता यंत्रणा उभारण्यात यावी
2. महिलांमधील अनारोग्य, अज्ञान व दारिद्र्य घालविण्याकरिता त्यांच्यामध्ये योग्य सामर्थ्य, क्षमता आणि योग्यता निर्माण होण्यासाठी महिलांचे शिक्षण कौशल्य विकास आणि नोकरी रोजगाराला चालना द्यावी.
3. महिलांना त्यांचे हक्क, अधिकार, संधी आणि जबाबदारी याबाबत जागृत करावे त्याकरिता जनजागरण कार्यक्रम आयोजित करावे.
4. परंपरागत व्यवसायाच्या पुढे जाऊन अर्थार्जनासाठी व स्वावलंबनासाठी महिलांना तयार करण्याकरिता योग्य विकल्प शोधावे.
5. महिलांना त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी योग्य वेतन देण्यात येऊन त्यांना कामाच्या ठिकाणी सुरक्षा देण्यात यावी
6. महिलांकरिता असलेल्या कायदे व नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी
7. महिलांना विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यात याव्यात तसेच मुद्रा योजना, बचत गट योजना यांचा विकास करावा

बदलत्या परिस्थितीत वाढत्या लोकसंख्येचा विचार करतांना राष्ट्रहित आणि राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाकरिता आणि प्रगती करिता भारता सारख्या लोकशाही प्रधान देशात बहुसंख्य असलेल्या महिला वर्गाच्या शक्तीचे क्षमतांचे, गुणवत्तेचे व श्रमशक्ती, बौध्दिक संपदेचे महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीमध्ये कृतिशील सहभाग व योग्य योगदान मिळविणे काळाची गरज आहे.

© 2024, SK Publisher All Rights Reserved

**निष्कर्ष:**

भारतीय कुटुंब प्रधान समाजव्यवस्थेमध्ये स्त्री ही कुटुंबाचा मूलभूत व अविभाज्य घटक आहे. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये लिंगभावानुसार स्त्रीला 'अबला' दुर्बल समजल्यामुळे, तिच्याविषयीचा भेदभावामुळे ती अनेक संधी सुविधा व अधिकारांपासून वंचित राहते. निर्णय प्रक्रियेतील सहभागाची संधी नाकारल्यामुळे, शिक्षणाच्या उणिवेमुळे महिलांची क्षमता उभारणीच होऊ न शकल्यामुळे महिला विकास व प्रगतीपासून दूर आणि महिलांपासून प्रगती, विकासांमध्ये कुटुंब, समाज व राष्ट्र दूर अशी परिस्थिती निर्माण होते. महिला कौटुंबीक हिंसाचार, अत्याचार, अन्याय, शोषणाच्या बळी ठरत आहेत. महिलांमध्ये अज्ञानामुळे शारीरिक अनारोग्य, कुपोषणाच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत.

सुसंस्कृत, समृद्ध, शिक्षित, स्वयंपूर्ण, आत्मनिर्भर समाज निर्मितीसाठी - विकास व सर्वांगीण प्रगतीसाठी महिलांची शक्ती, सामर्थ्य वाढविणे - त्यांच्या योग्यता क्षमता विकसित करणे - त्याकरिता महिलांच्या सक्षमीकरणाच्या योजना आखणे व त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे तसेच महिलांना शिक्षित कौशल्यनिपुण करून त्यांचे मानसिक परिवर्तन घडवून त्यांना रोजगाराच्या, नोकरीच्या संधी देऊन त्यांना आत्मनिर्भर स्वावलंबी बनवीणे. कुटुंबाचे आर्थिक मिळकतीत त्यांचे योगदान मिळिवणे महिलांना सन्मान, सुरक्षा देऊन त्यांच्यात आत्मभाव व आत्मविश्वास निर्माण करणे आणि त्यांचे कौटुंबिक, सामाजिक सांस्कृतिक आर्थिक राजकीय क्षेत्रामध्ये कृतिशील सहभाग व योगदान मिळविणे राष्ट्राच्या उज्वल भविष्यासाठी विकासाच्या प्रक्रियेत अत्यंत गरजेचे आहे त्या दृष्टीने कृती कार्यक्रम योजना व कायदे करण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

1. भारतीय समाजातील स्त्रियांची बदलती स्थिती, चैताली गुरव, लोकसत्ता, दिनांक 16/11/ 2015.
2. Issue 7: women Empowerment. Author & Publisher - UNFPA, PCDDPOA, Cairo, 1994.
3. भारतातील महिला सक्षमीकरणाचे धोरण आणि महिलांची सद्यस्थिती राजेंद्र कढव, जर्नल ऑफ इमर्जिंग टेक्नॉलॉजी अँड रिसर्च फेब्रुवारी .2020, अंक 7इशू 2, पृ 105 .क्र. –108 .
4. A study of women empowerment in India. K.U. Shobha. International Journal for Indian Trends in Science and Technology 7(1). Nov. 2021, PP 120-124.
5. भारतीय स्त्रियांचे कुटुंबातील आणि समाजातील स्थान. ज्योती आधार चौधरी, रिसर्च जर्नल इंटरनॅशनल मल्टीडिसीप्लनरी रिसर्च पेपर, अंक 1, एप्रिल जून-2014 पृ .क्र. 34-38.

:::. Cite this article .:::

तिहिले, प्रा. डॉ. संगीता. (2024). महिला सक्षमीकरण : गरज, कारणे आणि उपाय. SK International Journal of Multidisciplinary Research Hub, 11(12), 428–433. https://doi.org/10.61165/sk.publisher.v11i12.83